# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०६/२०२६ (बुधवार)**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयात जानेवारी ते मे सन २०२६ मध्ये सन २०२५ च्या तुलनेत गुन्हेगारी मध्ये लक्षणीय घट नोंदविण्यात आली आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार , वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण पोलीसांनी गुन्हेगारी नियंत्रणात यश संपादन केले आहे. नागपुर ग्रामीण जिल्हयात जानेवारी ते मे सन २०२६ मध्ये जानेवारी ते मे सन २०२५ च्या तुलनेत प्रमुख गुन्हयांमध्ये लक्षणीय घट नोंदविण्यात आली आहे.

**जानेवारी ते मे सन २०२६ मध्ये जानेवारी ते मे सन २०२५ च्या तुलनेत प्रमुख गुन्हयांचा विचार करता सन २०२५ मध्ये २२ खुनाचे गुन्हे दाखल होते तर सन २०२६ मध्ये १० खुनाच्या गुन्हयांची नोंद आहे. ( ५४.५५ टक्कयांनी घट झाली आहे). सन २०२५ मध्ये खुनाच्या प्रयत्नाचे २३ गुन्हे नोंद असुन सन २०२६ मध्ये २१ गुन्हे नोंद आहे (८.७ टक्कयांनी घट झाली आहे). सन २०२५ मध्ये दुखापतीचे ४५८ गुन्हे नोंद असुन सन २०२६ मध्ये ३४२ गुन्हे नोंद आहे (२५.३३ टक्कयांनी घट झाली आहे). सन २०२५ मध्ये अपहरणाचे ८६ गुन्हे नोंद असुन सन २०२६ मध्ये ७९ गुन्हे नोंद आहे .(८.१४ टक्कयांनी घट झाली आहे). सन २०२५ मध्ये विनयभंगाचे ९५ गुन्हे नोंद असुन सन २०२६ मध्ये**

**७६ गुन्हे नोंद आहे..(२० टक्कयांनी घट झाली आहे). तसेच सन २०२५ मध्ये चोरीचे ६१३ गुन्हे नोंद असुन सन २०२६ मध्ये ४३७ गुन्हे नोंद आहे. (२९ टक्कयांनी घट झाली आहे).**

**सदर गुन्हेगारीतील ही घट मोक्का (MCOCA), एमपीडीए (MPDA), हद्दपार कारवाया, कोंबिंग ऑपरेशन्स, आरोपी परेड तसेच विविध प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा सातत्यपूर्ण व कठोर वापर केल्यामुळे साध्य झाली आहे. नागपुर ग्रामीण जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी भविष्यातही अशाच प्रकारच्या प्रभावी उपाययोजना सातत्याने राबविण्यात येणार आहेत.**

## नागपुर ग्रामीण पोलसांनी "ऑपरेशन शोध IV" मोहीमे अंतर्गत हरवलेले/पळविलेले (अपहरण, अपनयन) झालेले बालके आणि बेपत्ता महीला यांचा शोध घेवुन एकुण ६४ प्रकरणांची उकल केली.

मा. अपर पोलीस महासंचालक, महीला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशाने दिनांक ०८/०६/२०२६ ते २३/०६/२०२६ या कालावधीत संपुर्ण राज्यात हरवलेल्या/ पळविलेल्या ( अपहरण, अपनयन ) बालकांचा शोध घेण्यासाठी **"**ऑपरेशन शोध **IV** **"** मोहीम राबवण्यात आली. या मोहीमे अंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हा येथे हरविलेल्या/ पळविलेल्या प्रकरणांमधील बालकांचा शोध घेण्याकरीता विविध शोध पथके नेमुन यशस्वीरित्या मोहीम पार पाडण्यात आली. मा.श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण, जिल्हा यांच्या मार्गदर्शनात या मोहिमेचे नेतृत्व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी केले असुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध विभाग, नागपुर ग्रामीण चे प्रमुख, पोलीस निरीक्षक श्री मिलींद तायडे, भरोसा सेल,

नागपुर ग्रामीण चे प्रमुख, पोलीस निरीक्षक श्री गणेश फुलकवर यांनी त्यांचे पथकांसह शोध मोहीम राबविली .

**प्रत्येक पोलीस स्टेशन ला १ असे एकुण २३ मिसींग शोध पथक स्थापन करण्यात आले होते. स्थापन केलेल्या विविध पथकांनी तांत्रिक पुरावे तसेच गुप्तबातमीदार यांच्या मदतीने हरविलेल्या/पळविलेल्या अल्पवयीन बालकांचा कसुन शोध घेतला. “ ऑपरेशन शोध IV ” मोहीमे अंतर्गत दिनांक ०८/०६/२०२६ ते २३/०६/२०२६ रोजी पर्यंत सन २०२१ पासुन हरविलेल्या/पळविलेल्या १० अल्पवयींन बालकांचा शोध घेण्यात आला तसेच याव्यतिरीक्त ५४ बेपत्ता महीलांचा सुध्दा शोध घेवुन एकुण ६४ प्रकरणांची उकल केली आहे.**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्रीसाठी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, २ आरोपी अटक
## ०८ लाख ०८ हजार ८९० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक २३/०६/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, चारचाकी वाहनाने अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील सालई नांदागोमुख रोडवर नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान संशयित टोयटा ईनोव्हा वाहन कार क्र एम एच ३१ डी के ३७१७ हे वाहन मिळुन आले. वाहनात **आरोपी क्रं १) श्री. रविद्र काशिनाथ श्रीरंगे, वय ४४ वर्ष, भांडे प्लाट सक्करदरा, उमरेड रोड, नागपूर २) श्री. निखील रमेशलाल ममतानी, वय ३२ वर्ष, रा. प्लाट नं. ३६५/५५ पंकज ट्रेडिंग कंपनीच्या समोर, जरीपटका नागपूर** हे मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन नमुद वाहनाची तपासणी केली असता प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष वेगवेगळया कंपनीचा २२९.६ किलोग्रॅम सुगंधित तंबाखु एकुण किंमती १,९३,८९०/— रूपये टोयटा ईनोव्हा वाहन कार क्र एम एच ३१ डी**

के ३७१७ किंमती ६,००,०००/—रूपये, २ ॲडरॉईड मोबाईल किंमती १५,०००/—रूपये असा एकुण ८,०८,८९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी नामे १) श्री. रविद्र काशिनाथ श्रीरंगे, वय ४४ वर्ष, भांडे प्लाट सक्करदरा, उमरेड रोड, नागपूर २) श्री. निखील रमेशलाल ममतानी, वय ३२ वर्ष, रा. प्लाट नं. ३६५/५५ पंकज ट्रेडिंग कंपनीच्या समोर, जरीपटका नागपूर यांनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उत्पादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीतांविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.



## पोलीस स्टेशन पारशिवनी, नागपूर ग्रामीण यांचा अवैध सावकारी विरोधी जनजागृती उपक्रम

नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने पोलीस स्टेशन पारशिवनी हद्दीमध्ये **अवैध सावकारी व्यवसायास प्रतिबंध घालण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम** राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, पोलीस स्टेशन हद्दीत कोणीही व्यक्ती बेकायदेशीरपणे सावकारी व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबतची माहिती अथवा तक्रार तात्काळ पोलीस स्टेशन पारशिवनी येथे नोंदवावी.

अवैध सावकारीमुळे अनेक नागरिक आर्थिक, सामाजिक व मानसिक त्रासाला सामोरे जात असल्याने अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या दबावाला बळी न पडता पुढे येऊन माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच यासंबधी कोणतीही माहीती असल्यास खालील संपर्क क्रमांकावर माहीती दयावी

**संपर्क क्रमांक — १) प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन पारशिवणी :— ९५५२५८२४१६**
**२) पोलीस स्टेशन पारशिवणी :— ०७१०२— २५१२३**



# पोलीस स्टेशन खापा यांनी सराईत गुन्हेगार समीर रोशन टेंभुर्णे, याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

**पोलीस स्टेशन खापा :—** पोलीस स्टेशन खापाच्या अभिलेखावरील सराईत आरोपी नामे समीर रोशन टेंभुर्णे, वय २० वर्ष, रा. वनदेवी नगर, शितलामाता मंदीर विटभट्टा चौक, यशोधरानगर नागपूर याचे विरूध्द साथीदारांसह जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न करणे, घरफोडी करणे, गंभीर दुखापत करणे, आगळीक करणे, अश्लील शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी देणे यासारखे गंभीर गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी हा असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. पोलीसांनी आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा आरोपीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**आरोपींचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी,सावनेर यांच्या मार्गदर्शनाखाली खापा पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार समीर रोशन टेंभुर्णे, वय २० वर्ष, रा. वनदेवी नगर, शितलामाता मंदीर विटभट्टा चौक, यशोधरानगर, नागपूर याचे विरूध्द स्थानबध्दतेचा आदेश काढला असता खापा पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन दिनांक २२/०६/२०२६ रोजी त्याला तात्काळ ताब्यात घेवुन जिल्हा कारागृह नागपुर येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.**



**स्थानबध्द आरोपी समीर रोशन टेंभुर्णे**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ७ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त,२ आरोपी अटक देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक २३/०६/२०२६ रोजी देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा बेलदा येथील नाल्याच्या परीसरात पेट्रीलींग केली असता ट्रॅक्टर क्र एम एच ४०/एल ७८४८ व विनाक्रमांकाची ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन चालकास वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन **चालक १) सौरभ किशोर कोकोडे, वय २० वर्ष, रा. सालई, ता. रामटेक, जि. नागपुर** हा मिळुन आला. आरोपीस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. मालकाबाबत विचारपुस केली असता मालक नामे **२) मिथुन हरी मेहर, वय ३८ वर्ष, रा. सालई ता. रामटेक, जि. नागपुर** अशी माहिती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता एक ट्रॅक्टर क्र एम एच ४०/एल ७८४८ किंमती ६,००,०००/— रूपये व विनाक्रमांकाची ट्रॉली किंमती**

**१,५०,०००/—रूपये आणि १ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये असा एकुण किंमती ७,५५,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं २०२३, ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४, २१ खानी आणि नियमन अधिनियम १९५७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०३ गुन्हे नोंद.

**दिनांक २३/०६/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन कुही, रामटेक, बोरी यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळणाऱ्या तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते तसेच सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण २५६५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.**

**पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे १) विलास मुकुंदा गजभिये, वय ४७ वर्ष, २) राजु मानिक चौधरी, वय ४४ वर्ष ३) सुधाकर लक्ष्मण शेन्डे, वय ५१ वर्ष ४) राजु तुळशीराम शेन्डे, वय ५७ वर्ष ५) शेखर पांडुरंग चौधरी, वय ५५ वर्ष, सर्व रा. पिपळा, ता. उमरेड ५) शेखर पांडुरंग चौधरी, वय ५५ वर्ष, सर्व रा. पिपळा, ता.उमरेड ६) दिनेश धर्मदास गडपायले ७) प्रफुल कवडु भोयर, वय २१ वर्ष, रा. पिपळा, ता. उमरेड हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे १) आशिष अनिल नवघरे, वय ३२ वर्ष, २) शंकर मधुकर लोंढे, वय ३४ वर्ष, ३) उपासराव उर्फ बाल्या रामाजी आकरे, वय ४५ वर्ष, ४) सुरज मुडले, सर्व रा. साटक, ता. पारशिवनी, जि.नागपूर हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे चंद्रशेखर पंजाबराव पाटील, वय ४२ वर्ष, वार्ड क्र ०३, करजगाव पोस्टे कोदेगाव, ता. सावनेर, जि. नागपुर ह. मु. ऑफीसर कॉलोनी बोरखेडी फाटक, ता. जि. नागपुर हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०४ गुन्हे नोंद

दिनांक २३/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन कोंढाळी, काटोल, वेलतूर पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू व इतर साहित्य असा एकुण ८००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी आदित्य दिलीप वाघमारे, वय २७ वर्ष, रा. अमरावती, पो. राजापेट ता. जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी १) सतिश विनायकराव डोंगरे, वय ४१ वर्ष, रा. रिधोरा, ता. काटोल २) महेश शंकरराव कळसकर, वय ३६ वर्ष, रा. रिधोरा, ता. काटोल यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी अंकुष बाबाजी बावणे, वय ४५ वर्ष, रा. पचखेडी, ता. कुही याचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १८०० मिली देशी दारू असा एकुण ८००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने